**योजनेचे नांव :-** 13 वने 7 टक्के वन महसूल सन 2024-25 या वित्तीय वर्षात शेतक-यांना कुंपनाकरीता तारेची जाळी खरेदीवर 75 % अनुदान देणे.

**तरतूद :-** रुपये 1500000/- (अक्षरी रुपये पंधरा लाख )

**योजनेचा उद्देश :-** गडचिरोली जिल्हयातील रब्बी पिके भाजीपाला किंवा फळझाडाची उत्पादन व क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीन शेतक-यांना मोकाट व जंगली जनावरापासून त्यांच्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी शेतक-यांना शेतीकरीता तारेची जाळी खरेदीवर 75% किंवा रुपये 6375/- प्रती क्विंटल महत्तम रु. 19125/- ( 3.00 किंटल मर्यादेत) यापैकी जे कमी असेल ते अनुदान देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. (तारेची जाळीची अंदाजित किंमत रु. 8500 प्रती क्विंटल)

**योजना राबविण्याची कार्यपध्दती :-** जिल्हातील शेतक-यांना खालील अटी व शर्तीचे अधिन राहून तारेची जाळीवर अनुदान देण्याचे प्रस्तावित आहे.

1. योजनेचा लाभ दिव्यांग शेतकरी, विधवा महीला शेतकरी, महीला शेतकरी, वनपटेधारक, अनु. जाती, अनु. जमाती, भटक्या व विमुक्त जाती जमाती किंवा इतर संवर्गातील अल्प भुधारक शेतका-यांना प्राधान्याने समुह स्वरुपात तसेच वैयक्तीकरित्या देय राहील.
2. ज्यांचे कडे कमीत कमी 0.20 हेक्टर क्षेत्रात भाजीपाला ,रब्बी पिके किंवा फळझाडाची लागवड केली अशा शेतक-यांना प्राधान्याने तारेची जाळी खरेदीवर अनुदान देय राहील.
3. सामुहीक गट स्वरुपात कूंपन करणा-या शेतक-यांची निवड प्राधान्याने देय राहील.
4. ईच्छुक लाभधारकास 0.40 हेक्टरचे मर्यादेत तारेची जाळी खरेदी करता येईल. व 0.40 हेक्टर करीता 3.00 क्विंटल मर्यादेत तारेची जाळी वर अनुदान देय राहील.

**<u>योजनेच्या अटीव शर्ती</u> :-**

1.लाभार्थी निवड पंचायत समिती स्तरावर पंचायत समिती स्तरावरील निवड समितीद्वारे करण्यात येइल पंचायत समितीचे गट विकास अधिकारी , कृषि अधिकारी व विस्तार अधिकारी ( कृषि ) सचिव अंतिम यादी कृषि विकास अधिका-याकडे सादर करतील.

2. योजनेचा लाभ अंपग शतकरी, विधवा महिला शेतकरी , वनपटेधारक, अनु. जाती,अनु .जमाती शेतक-याना प्राधान्याने समुह स्वरुपात तसेच वैयक्तीकरीत्या प्राधान्याने देय राहील.

3.शेतक-यांनी अर्ज,जमीनीचा सातबारा,नमुना-8अ, जातीचे प्रमाणपत्र तसेच अर्ज, बॅक पासबुक झेरॉक्स व आधार कार्ड देणे बंधनकारक राहील.

4. सदर योजना डिबीटी प्रणाली द्वारे राबविण्यात येईल.

5. इच्छुक शेतक-यास वरील कागदपत्रासह पंचायत समिती स्तरावर कृषि विभागाकडे अर्ज सादर करणे बंधनकारक आहे.

6. पंचायत समिती स्तरावर अंतिम निवड यादी तयार करतांना जिल्हा स्तरावरुन देण्यात येणा-या लक्षांकानुसार अंतिम यादी व प्रतिक्षा यादी तयार करावी. अर्ज लक्षांकापेक्षा जास्त प्रमाणात उपलब्ध झाल्यास लॉटरी पध्दतीनेनिवड करण्यात येईल.

7. अंतिम निवड झालेल्या शेतक-यांना गट विकास अधिकारी पूर्वसंम्मती देतील.

8. पूर्वसंम्मती दिल्यानंतर काटेरी जाळीचे तार 15 दिवसात खरेदी करणे शेतक-यांना बंधनकारक राहिल, 15 दिवसात जाळीचे तार खरेदी न केल्यास त्याची निवड आपोआप रद्द होईल व प्रतिक्षा यादितील शेतक-याची निवड करुन त्यास पूर्वसंम्मती देण्यात येईल.

9. शेतक-याने शेतात स्वत: लाकडी किंवा सिमेंट पोलची व्यवस्था करुन तारेची जाळी शेतात स्वखर्चाने लावने बंधनकारक राहिल.

10. खुल्या बाजारातुन शेतक-याने तारेची जाळी खरेदी केल्यानंतर व तारेची जाळी शेतात लावल्यानंतर जीएसटी चे पक्केदेयक पंचायत समितीत सादर करेल, पंचायत समितीचे कृषि अधिकारी किंवा विस्तार अधिकारी कृषि प्रत्यक्ष तपासणी करुन नोट कॅम मध्ये फोटो घेतील व तपासणी प्रमाणपत्रासह देयके जिल्हा स्तरावर कृषि विभागास सादर करतील. जिल्हा स्तरावरील देयके पारीत करुन सबंधित शेतक-याचे बॅक खात्यात अनुदान रक्कम वळती करण्यांत येईल.

11. अनुदान जिएसटी वगळुन ताराच्या जाळीवर देण्यांत येईल.

12. सदर योजना जिल्हयाकरीता सन 2024-25 हया वर्षाकरीता राबविण्यांत येईल.

उपरोक्त अटीच्या आधारे जाळीचे तार खरेदी केलेल्या शेतक-यांना अनुदान देय राहिल. योजनेवर होणारा खर्च 13 वने 7 टक्के वन महसुल सन 2024-25 या वर्षात शेतक-यांना तारेची जाळी खरेदीवर 75 टक्के अनुदान देणे. लेखाशिर्ष (101-21) बागायती शेतक-यांना काटेरी तारेचे /जाळीच्या तारेचे कुंपणाकरीता अनुदान देणे या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यांत येईल.

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद,गडचिरोली

| | दुरध्वनी क्रमांक<br>(07132-222312) | जिल्हा परिषद, गडचिरोली कृषी विभाग<br>Email :-adozp-gad@yahoo.co.in<br>adozgad@gmail.com |
|---|---|---|
| जावक क्रमांक/जिपग/कृषी/लेखा/ /2024, | | दिनांक / /2024 |

प्रति,

1. गट विकास अधिकारी
   पंचायत समिती -----------------(सर्व)
2. कृषि अधिकारी
   पंचायत समिती -----------------(सर्व)

**विषय** :- 13 वने 7 % वन महसुल अनुदान सन 2024-25 जाळीचे तार खरेदीवर 75 % अनुदान देणे अंतर्गत लाभार्थी निवड करुन अंतीम मान्यतेस्तव यादी सादर करणे व लक्षांक निश्चित करुन देणेबाबत.

**संदर्भ** :- या कार्यालयाचे पत्र क्रमांक/जिपग/ कृषि/लेखा 1763/2024 दिनांक 11.09.2024

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येत आहे की, विषयांकीत योजनेअंतर्गत योजनेत पात्र असलेल्या शेतक-यांना जाळीचे तार खरेदीवर 75 % अनुदान देण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरीता योजनेची व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी. तसेच पंचायत समिती स्तरावर पात्र शेतक-याचे अर्ज मागविण्यात यावेत. अनुदानाच्या प्रमाणात अर्ज मंजूर करावेत. तसेच जास्तीचे अर्ज प्राप्त झाल्यास लॉटरी पध्दतीन निवड करण्यात यावी व अंतीम निवड यादी व प्रतीक्षा यादी या कार्यालयास सादर करावी. सदर यादीस अंतीम मान्यता या कार्यालयाकडून देण्यात आल्यानंतर संबंधीत शेतक-यांना लाभ देण्यात यावा. सदर यादी दिनांक 30.09.2024 पर्यंत या कार्यालयास सादर करावी . अंतीम निवड यादी आर्थिक लक्षांकाचे अधिन राहून तयार करण्यात यावी.

आर्थिक लक्षांक खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. गडचिरोली - रु. 125000/- | 2. आरमोरी - रु. 125000/- | 3. वडसा - रु. 125000/- |
| 4. कुरखेडा - रु. 125000/- | 5. कोरची - रु. 125000/- | 6. धानोरा - रु. 125000/- |
| 7. चामोर्शी - रु. 125000/- | 8. मुलचेरा - रु. 125000/- | 9. अहेरी - रु. 125000/- |
| 10. एटापल्ली - रु. 125000/- | 11. भामरागड - रु. 125000/- | 12. सिरोंचा - रु. 125000/- |

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली

**प्रतीलीपी :- माहीतीस सविनय सादर**

3. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, गडचिरोली.
4. मा. अपर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, गडचिरोली.

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली

# अर्ज

प्रति,

मा. गट विकास अधिकारी
पंचायत समिती------------

**विषय** :- तारेची जाळी 75% अनुदानावर देणेबाबत परवानगी मिळणेबाबत.

1. शेतकऱ्याचे संपूर्ण नांव :  श्री..........
2. जातीचा वर्गवारी (SC/ST/OBC/NT)
3. घेत असलेले पिक
4. जमीनीचे क्षेत्र                    हेक्टर                    आर
5. तारेची जाळीची मागणी                    क्विंटल

मी हमीपत्र लिहून देतो की, श्री                                        रा. ....................
तालुका                    जिल्हा [illegible] येथील रहिवाशी असून वरील दिल्या प्रमाणे माहिती सत्य असुन असत्य आढळल्यास शासन या कारवाईस मी पात्र राहीन याची मला जाणीव आहे. माझ्या शेतीचे कुंपनाकरीता तारेच्या जाळीची आवश्यकता आहे. तरी मला अनुदानावर मिळणारी जाळी घेण्यास पूर्व परवानगी देण्यात यावी. मी स्वखर्चाने तारेची जाळी घेण्यास तयार असून त्याचा उपयोग माझे शेतातील पिक संरक्षण करीता करीन त्याचा दुरुपयोग करणार नाही याची हमी देत आहे.

दिनांक :
ठिकाण :

शेतकरी याची स्वाक्षरी

**खालील कागदपत्राची सत्यप्रत जोडावी**

1) 7/12
2) नमुना 8 अ / वनपट्टा
3) आधार कार्ड
4) पास बूक
5) जातीचा प्रमाणपत्र